परिवहन समितीच्या सोमवार दि. २३/०७/२०१८ रोजी दुपारी ०३:०० वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

<u>उपस्थित सदस्य</u>

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. जितेंद्र धनराज कुकडे | सभापती |
| 2 | मा. श्री. प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| 3 | मा. श्री. नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| 4 | मा. सौ. मनिषा आशिष धावडे | सदस्या |
| 5 | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 6 | मा. सौ. उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| 7 | मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| 8 | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |

अनुपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| 2 | मा. सौ. विद्या योगेश मडावी | सदस्या |
| 3 | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 4 | मा. श्री. नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य |
| 5 | मा. श्री. विरेन्द्र घनश्यामदास कुकरेजा<br>सभापती स्थायी समिती – पदेन सदस्य | सदस्य |

उपस्थित अधिकारी

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | श्री. शिवाजी जगताप | परिवहन व्यवस्थापक |
| 2 | श्री. हरिश दुबे | निगम सचिव |

मा.सभापती, परिवहन समितीच्या सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक ०३</u> :— परिवहन विभाग मनपाचे आर्थिक वर्ष २०१८—१९ मधे मनपा निधीतुन रुपये १०० कोटी निधी मंजुर करण्यात आला असुन NMC The City of Nagpur Transport Fund या बँक ऑफ महाराष्ट्र, सिव्हील लाईन्स नागपूर च्या Current Account मध्ये माहे एप्रिल २०१८ला रूपये ४,८२,०३,९५९/— तिकीट विक्री चा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी एप्रिल २०१८ ला एकुण रु. २७,१०,२५,५९१/— हा विविध लेखाशिर्षा अंतर्गत खर्च झाला आहे. सदर खर्चापैकी मनपा कडुन परिवहन विभागाकरिता उपलब्ध झालेल्या अनुदानातुन रुपये २३ कोटी ची रक्कम संबंधीत कंत्राटदारांचे देयकांच्या रक्कमेच्या अदायगीस्तव खर्ची करण्यात आली आहे.

या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समिती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेणाचा प्रश्न समितीने विचारात घेवुन सभेत अति.आयुक्त उपस्थित नसल्यामुळे हा विषय स्थगीत ठेवण्यात आला.

**ठराव क्रमांक ०४ :—** परिवहन विभाग मनपाचे आर्थीक वर्ष २०१८—१९ मधे मनपा निधीतुन रुपये १०० कोटी निधी मंजुर करण्यात आला असुन NMC The City of Nagpur Transport Fund या बँक ऑफ महाराष्ट्र, सिव्हील लाईन्स, नागपूर च्या Current Account मध्ये माहे मे २०१८ला रूपये ५,५९,७७,५७२/— तिकीट विक्री चा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी मे २०१८ ला एकुण रु.५,९८,६९,४१७/— हा विविध लेखाशिर्षा अंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समिती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेणाचा प्रश्न समितीने विचारात घेवुन सभेत अति.आयुक्त उपस्थित नसल्यामुळे हा विषय स्थगीत ठेवण्यात आला.

**ठराव क्रमांक ०५ :—** परिवहन विभाग, मनपा चे आर्थिक वर्ष २०१८—१९ मध्ये मनपा निधीतून रु. १०० कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund, या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स नागपूर च्या Current Account मध्ये सुरूवातीची शिल्लकसह माहे जुन २०१८ रू. ५,६४,२४,८२५/—तिकीट विक्रीचा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी जुन २०१८ एकूण रु. ६,३२,७४,४६६/— हा विविध लेखा शिर्षाअंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समीती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन सभेत अति.आयुक्त उपस्थित नसल्यामुळे हा विषय स्थगीत ठेवण्यात आला.

**ठराव क्रमांक ०६ :—** श्री. रामराव मातकर, अतांत्रिक पर्यवेक्षक यांचा कार्यकाळ पुढील ०६ महिन्याकरीता वाढविण्याकरीता विषय क्र. ४५ अन्वये परिवहन समिती समोर ठेवण्यात आलेला होता. त्यामध्ये ठराव क्र. ५४, दि. ०८/०५/२०१८ अन्वये श्री. मातकर यांनी खासदार क्रिडा महोत्सवा दरम्यान त्यांचेवर सोपविण्यात आलेली वाहन व्यवस्थापनाची जबाबदारी पुर्ण केली नसल्यामुळे देशाच्या विविध भागातुन नागपूर शहरात या कार्यक्रमात भाग घेण्यास्तव आलेल्या क्रिडापटुंना वाहनांची अडचण व असहकार्याचा त्रास सहन करावा लागला असल्यामुळे या प्रकणाची चौकशी करण्यास्तव विषय विभागास परत पाठविण्यात आलेला होता. त्याअनुषंगाने, श्री. मातकर यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आले व त्यांनी आपले स्पष्टीकरण सादर केलेले असून त्यांनी या सर्व घटनेला डिम्टस् ला जबाबदार धरलेले आहे. श्री. मातकर यांचे स्पष्टीकरणाचे अवलोकन केले असता या संपुर्ण बस डेपो मॅनेजर, डिम्टस् व श्री. मातकर यांचे मध्ये समन्वयाचा अभाव झाल्याचे दिसुन येते की, खासदार महोत्सवात फक्त ०३ बसेस चा घोळ निर्माण झाला व ३७ बसेस वेळेपुर्वी उपस्थित झाल्या. या ०३ बसेसची मागणी वेळेवर आल्याने ही परिस्थिती निर्माण झाल्याचे श्री. मातकर यांचे निवेदन आहे. संपुर्ण बाबी ची चौकशी करून मा. सभापती, परिवहन समिती यांनी श्री. मातकर यांना एक शेवटची संधी व समज देवून यापुढे यांचे कामात चुक होणार नाही, अशी ताकीद देण्यात यावी, असे निर्देश दिले.

श्री. रामराव मातकर यांना दि. १०/०४/२०१८ ते ०९/१०/२०१८ पर्यंत ०६ महिन्याकरीता मंजूर रू. २२,०००/— या मानधनावर यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन श्री.रामराव मातकर हे कंत्राट पध्दतीवर परिवहन विभागात काम करीत आहे. मा. सभापती, परिवहन यांनी या विषयात असे सुचविले की, श्री. मातकर यांच्या कामाचा व्याप हा अधिक असल्याने यांचे सोबत अतिरिक्त २ व्यक्ती कंत्राट पध्दतीवर नियुक्त करण्यात याव्या, या सूचनेसह सदर विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक ०७ :— जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक, नागपूर यांचे पत्र क्र. ३७९—८१/२०४८, दि. २५/०६/२०१८ च्या अनुसरून मा. आयुक्त महोदयांनी याबाबत तात्काळ कार्यवाही करून पासेस उपलब्ध करणेबाबत आदेशित केलेले आहे. याकरीता परिवहन विभाग, मनपामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

१) ए.आर.टी. औषधे घेणेकरीता ए.आर.टी. केंद्रात येणाऱ्या व्यक्तिंना पैशे अभावी त्यांच्या औषधीत खंड पडु नये या मानविय दृष्टीकोणातुन मनपाद्वारे संचलित रेड शहरबस वाहतुकीच्या मोफत बस पासेस उपलब्ध करणे प्रस्तावित आहे.
२) याकरीता मनपा स्वास्थ अधिकारी (वैद्यकीय) यांनी सांक्षाकीत केलेली यादी परिवहन विभागास पाठविल्यानंतर मोफत बस पास चे स्मार्टकार्ड हे त्वरीत संबंधीत अशिलांला जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक, नागपूर यांचे द्वारे सुपुर्द करण्याची तजबित करण्यात येईल.
३) या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर विषय व मोफत पास देण्याचे धोरणात्मक निर्णयाची मान्यता घेण्यासाठी मा. परिवहन समिती, मनपा, नागपूर यांचेकडे प्रस्ताव पाठवुन सादर करण्यात येईल. तसेच याकरीता परिवहन विभागाद्वारे खालीलप्रमाणे कार्यवाहीची प्रणाली निश्चित करण्यात येईल.

अ) सर्व लाभार्थी अशिलांना व्यक्तिगत ०१ मोफत स्माट कार्ड उपलब्ध करून देण्यात येईल व लाभार्थी कडुन कुठलेही मुल्य वसुल केल्या जाणार नाही.
ब) जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक यांचे मागणीनुसार लाभार्थ्यांना त्यांचे राहत्या घरापासुन ए.आर.टी. केंद्रा करीता महिन्यात सहा वेळा मोफत प्रवासाची मुभा देय राहील. अर्थातच मोफत प्रवाश्यांची मुभा ही शहरबस सुरू असलेल्या नागपूर शहराच्या हद्दीतील तसेच नागपूर जिल्हयातील ज्या ठिकाणापासुन शहरबस सेवा उपलब्ध आहे, त्यासाठीच लागु राहील.
क) या पास धारकांनी उपलब्ध असलेल्या वेळापत्रकानुसारच बसेसचा वापर करण्याची परवानगी राहील. कुठलीही अतिरिक्त किंवा जादा फेरी सोडणे बंधनकारक राहणार नाही.
ड) लाभार्थ्यांनी केवळ रेड शहरबस मधुनच प्रवास करावा.
इ) याबाबत परिवहन विभाग, मनपाचे प्रोग्राम मॅनेजर, मे. डिम्टस् यांना लाभार्थी अशिलांची यादी, फोटोसह जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक यांनी सुपुर्द केल्यानंतर मे. डिम्टस् हे त्वरीत संबंधीत व्यवस्थापकांना त्या—त्या लाभार्थी अशिलाचे स्मार्टकार्ड सुपुर्द करतील. सदर कार्यक्रमाचे संबंधीत कार्यवाही विषयक मे. डिम्टस् यांना या कार्यालयामार्फत दिशा निर्देश केलेले पत्र सोबत नस्तीत संलग्न आहे.

ई) या स्मार्टकार्ड मध्ये ०१ वर्षातील सर्व १२ महिन्यांमध्ये प्रवास करण्याची मुभा राहील व पासचे दरवर्षी नुतणीकरण करण्यात येईल. तथापी ते प्रत्येक महिन्यात ०६ दिवसाकरीता राहील, अशी तजबिज सॉफ्टवेअर द्वारे स्मार्टकार्ड निर्मिती करीता निश्चिती केली जाईल.

फ) एच.आय.व्ही. बाधीत अशिलांची माहिती गोपनिय ठेवणेबाबत संदर्भिय पत्र क्र. ०१ मध्ये नमुद असल्याने परिवहन विभागाचे पत्राशिवाय अन्य सर्व दस्ताऐवज, स्मार्ट कार्ड, पास कॉउन्टरची पाटी इत्यादी ठिकाणी फक्त खालील शब्दांचा वापर मराठी व इंग्रजी करीता करण्यात येईल.

**मराठी भाषा :— ''दूर्धर आजार'' मोफत पास**

**इंग्रजी भाषा :— ''Chronic Disease'' Free Pass**

तसेच शिफारस करण्यात येत आहे की, स्मार्टकार्ड वर फक्त ''Notified Disease'' असे नमुद केले जाईल, ज्यामुळे अन्य रोगग्रस्थ या मोफत स्मार्टकार्डची मागणी करणार नाही. करीता सदर बाधीत अशिलांना वरीलप्रमाणे कार्यपध्दतीच्या अवलंब करून रेड शहरबस वाहतुकीमध्ये मोफत पास देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेवुन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक ०८</u> :— ७ वी आशियाई शालेय बॅडमिंटन स्पर्धा दि.६/०७/२०१८ ते १३/०७/२०१८ या कालावधीत पार पडली. या स्पर्धेकरीता महानगरपालिकेने ८ वातानुकुलीत ग्रीन बसेस निशुल्क उपलब्ध करुन दिल्या. याकरीता मनपाला रु. १२ लक्ष खर्च आलेला असून या खर्चास तसेच ८ ग्रीन बस निशुल्क देण्यास कार्योत्तर मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक ०९</u> :— दि. ०६/०५/२०१८ ला खासदार क्रिडा महोत्सवाचा उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला होता व याकरीता खासदार क्रिडा महोत्सवाकरीता दि. ०४/०५/२०१८ पासुन बस उपलब्ध करून देण्यात आल्या. दि. ०६/०५/२०१८ ला नागपूर शहराचे निरनिराळया भागातुन खेळाडु व इतर नागरिकांना क्रिडा संकुल कोराडी रोड, मानकापुर, नागपूर येथे येण्याकरीता त्याचप्रमाणे समारोप समारंभास दि. २६/०५/२०१८ ला नागपूर शहरातील विविध भागातुन यशवंत स्टेडियम येथे नागरिकांना तसेच खेडाळुंना नेण्या व आणण्या करीता बसेस निशुल्क पुरविण्यात आल्या. या सर्व कार्यक्रमाकरीता रू. ६,४३,७७८/— खर्च आलेला असून या संपुर्ण कार्यास पुरविण्यात आलेल्या निशुल्क बसेस व हया करीता झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

श्री.प्रविण भिसीकर :— मा.सभापती महोदय, आजच्या सभेत अति. आयुक्त सभेमध्ये उपस्थित असावयास पाहिजे होते परंतु ते सभेमध्ये आले नाही. याची दखल घेण्यात यावी. परिवहन विषयाच्या संदर्भात काही आर्थिक विषयावर अडचण निर्माण झाल्यास आपण त्यांच्या समोर त्या विषयावर चर्चा करु शकतो. पुढच्या सभेत अति. आयुक्त यांना परिवहन समितीच्या सभेत हजर राहण्याचे सूचित करण्यात यावे. महानगरपालिकेच्या वाडी नाक्यामध्ये सुरक्षा रक्षक लावण्यात आले आहे. त्या सुरक्षा

रक्षकांचा पगार कोणत्या विभागाकडुन काढण्यात येते, मला प्राप्त झालेल्या माहिती नुसार परिवहन विभागाकडुन त्यांचा पगार काढण्यात येत आहे. अशा प्रकारे परिवहन विभागाला सुरक्षा रक्षक ठेवता येत नाही. महानगरपालिकेच्या माध्यमातुन सुरक्षा रक्षक घ्यावयास पाहिजे होते. कॉट्रॅक्ट अग्रीमेंट नुसार एका सुरक्षा रक्षकाला १८,५००/— रु. पगार दयावा लागत आहे. अगोदरच परिवहन विभाग हा तोटयात सुरु आहे. हे सुरक्षा रक्षक कोणत्या पध्दतीने व कोणाच्या परवानगीने घेण्यात आले आहे. या सुरक्षा रक्षकांचा पगार त्यांच्या खात्यामध्ये जमा होतो किंवा नाही याची पडताळणी कोणाच्या माध्यमातुन केली जाते, या विषयाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. पुढील सभेत आयुक्त दर्जाचे अधिकारी सभेत उपस्थित असले पाहिजे. परिवहन समितीच्या अंतर्गत धोरणात्मक बाबी व प्रमुख लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडे परिवहन संदर्भात प्रलंबित विषयावर समितीच्या सभेत चर्चा होणे आवश्यक आहे या दृष्टीकोणातुन विभागाने आवश्यक ती कारवाई करावी.

सभापती :— पुढच्या परिवहन समितीच्या सभेत अति. आयुक्त यांनी सभेत उपस्थित रहावे. याच बरोबर कर्करोग रुग्णांना मोफत बस पास सुविधा देण्याच्या संदर्भात पुढच्या परिवहन समितीच्या सभेत विषयपत्रिकेवर विषय आणण्यात यावा. मा.सदस्य श्री.प्रविण भिसीकर यांनी वाडी नाक्यावर परिवहन विभागाच्या वतीने लावण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांच्या संदर्भात जो विषय उपस्थित केला आहे त्याचा सविस्तर अहवाल मा. सभापती महोदयांना सादर करण्यात यावा.

ठराव क्रमांक १० :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करून ही सभा अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
परिवहन समिती
महानगरपालिका,नागपूर